# शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल

## अहवाल: गांधी व शास्त्री जयंती कार्यक्रम

तारीख: २ ऑक्टोबर २०२४

स्थान: शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

२ ऑक्टोबर २०२४ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे गांधी व शास्त्री जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम यांनी केले.

कार्यक्रमाची सूत्रसंचलन बी.एड. प्रथम वर्ष विद्यार्थिनी तनुश्री आठवले यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली आणि उपस्थितांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक रुजुता म्हात्रे यांनी सादर केले. कार्यक्रमात रूनाली कचरे, रोहन भोईर, आणि अक्सा खान यांनी गांधी व शास्त्री यांच्या जीवनावर भाषण सादर केले. रूनाली कचरेने गांधीजींच्या अहिंसात्मक तत्वज्ञानावर प्रकाश टाकला, तर रोहन भोईरने शास्त्रींच्या नेतृत्वाबद्दल आणि त्यांच्या कार्याची महत्त्वाची चर्चा केली. अक्सा खानने दोन्ही नेत्यांच्या विचारांचा आजच्या युवापिढीवर होणारा प्रभाव यावर विचार केला.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रा. बिजली दडपे यांनी त्यांच्या भाषणातून फार सुंदरित्या गांधीजी व शास्त्रीजी यांच्या आयुष्याची वाटचाल सांगितली. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनातील विचार, त्यांचे योगदान आणि मूल्य याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समारोपात प्राचार्या डॉ. रमा भोसले मॅडम यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गर्शन केले आणि गांधी व शास्त्री यांच्या विचारांची अमूल्यता आणि त्यांच्या आदर्शांचा आपल्या जीवनात उपयोग करण्याचे आवाहन केले.

स्मितल कुरूप यांनी आभार प्रदर्शन केले व कार्यक्रमाला विराम पसायदानाने दिला.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयतेची भावना, एकता आणि शांतीच्या मूल्यांचा प्रसार झाला.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.**

## कार्यक्रम पत्रिका

**3 ऑक्टोबर 2024**
**वेळ: दुपारी 2.30 वाजता**

## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन | मा.अध्यक्ष व सर्व प्राध्यापकांच्या हस्ते |
| स्वागत गीत | प्रथम वर्ष छात्राध्यापक |
| मा.अध्यक्ष डॉ.रमा भोसले यांचे स्वागत | प्रा. डॉ. नीलिमा मोरे |
| प्रमुख वक्त्याचे स्वागत | प्रा. डॉ. नीलिमा मोरे |
| प्राध्यापकांचे स्वागत | प्रथम वर्ष छात्राध्यापक |
| प्रास्ताविक | ऋजुता म्हात्रे |
| छात्राध्यापकांचे भाषण<br>1. अक्सा खान | प्रथम वर्ष छात्राध्यापक<br>1. म. गांधी |
| 2. रोहन भोईर<br>3. रुणाली कचरे | 2. लालबहादूर शास्त्री<br>3. लालबहादूर शास्त्री |
| प्रमुख वक्त्यांचे व्याख्यान | प्रा.बिजली दडपे |
| अध्यक्षीय मनोगत | मा.प्राचार्य डॉ.रमा भोसले |
| आभार प्रदर्शन | स्मितल कुरूप |
| सूत्रसंचालन | तनुश्री आठवले |

Edit with WPS Office

## निमंत्रण पत्रिका

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## सस्नेह निमंत्रण

मा.प्राचार्य, सर्व प्राध्यापक व सर्व बी.एड. प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थींना कळविण्यास आनंद होत आहे की, महाविद्यालयामध्ये गुरुवार दि. 3/10/2024 रोजी ' **महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती** ' निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**कार्यक्रम अध्यक्ष**

प्रा..डॉ.रमा भोसले.

**प्रमुख वक्ते**

प्रा.बिजली दडपे.

**मार्गदर्शक**

प्रा.डॉ.नीलिमा मोरे

**वेळ**:दुपारी 2:30 वाजता. **स्थळ**: सरस्वती कक्ष.

Edit with WPS Office




म.गांधी व शास्त्री जयंती कार्यक्रमात प्रा. डॉ. नीलिमा मोरे मा. प्राचार्या कार्यक्रम अध्यक्षा डॉ. रमा भोसले यांचे स्वागत करताना.




प्रमुख वक्त्या मा. प्रा. बिजली दडपे भाषण देताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापक ऋणाली कचरे लाल बहादूर शास्त्री यांच्याबद्दल माहिती देताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापक अक्सा खान महात्मा गांधी यांच्याबद्दल माहिती देताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापक रोहन भोईर लाल बहादूर शास्त्री यांच्याबद्दल माहिती देताना.




अध्यक्षा मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले अध्यक्षीय भाषण देताना.




म. गांधी व शास्त्री जयंती
फलक लेखन.




प्रथम वर्ष छात्राध्यापक आणि
मार्गदर्शक प्रा. डॉ. नीलिमा मोरे.







प्रथम वर्ष छात्र अध्यापक स्वच्छता अभियान राबविताना.




प्रथम वर्ष छात्र अध्यापक
स्वच्छता अभियान राबविताना.




स्वच्छता अभियान राबवण्यासाठी
मार्गदर्शन करताना प्रा
डॉ. नीलिमा मोरे.